

Rayat Shikshan Sanstha's

Balwant College, Vita

# News Paper Clippings

# 2021-2022

**Rayat Shikshan Sanstha's**
**Balwant College Vita**
**News Papers Clippings 2021-2022**

**Tarun Bharat Date-11-01-2022**

तरुण भारत
सांगली
दिनांक
मंगळवार दि. ११ जानेवारी २०२२

# गुणवंत विद्यार्थी हेच 'रयत'चे बलस्थान : डॉ. विठ्ठल शिवणकर

प्रतिनिधी
विटा

गुणवंत विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेची बलस्थाने आहेत. विद्यार्थी केंद्रस्थानी ठेऊन संस्था अनेक नवनवीन उपक्रम राबवीत असते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या जातात. त्याचे फलित म्हणून लाखो विद्यार्थी आज सक्षमपणे उभे आहेत, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले, कर्मवीर आण्णांनी अथक परिश्रमातून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीरांच्या विचार कार्याला प्रमाण मानून रयतने स्थापनेपासून शंभर वर्षात शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र क्रांती घडवून आणला आहे. आशिया खंडातील अग्रगण्य शिक्षण संस्था. ही ओळख निर्माण करण्यासाठी रयतच्या प्रत्येक सेवकाने भरीव योगदान दिले आहे. भविष्यकाळात ही ओळख आणखीनच समृद्ध करण्याचा संस्थेचा मानस आहे.' स्वावलंबी शिक्षणाची विचारधारा प्रत्यक्षात राबवून गोरगरीब, बहुजन समाजातील विद्यार्थांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे परिवर्तनवादी कार्य रयतने केले आहे. स्वावलंबी विद्यार्थी घडविण्यात रयतचे योगदान आहे, असेही प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले.

माधवराव मोहिते म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचार कार्याचा वारसा कर्मवीर अण्णांनी पुढे चालवंत शिक्षणाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहचविली. बहुजन समाजातील अनेक हुशार, कर्तृत्ववान विद्यार्थी हेरून त्यांना शिक्षण देऊन नवा महाराष्ट्र घडविण्याचे परिवर्तनवादी कार्य कर्मवीर आण्णांनी केले. हे कार्य अतुलनीय असे आहे.




विटा : गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात बोलताना प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, यावेळी माधवराव मोहिते, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर

यावेळी बळवंत कॉलेज, विटा मधील शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाकडून ११ कोटी रूपयांचा मुख्यमंत्री सहाय्यता निधी रयत शिक्षण संस्थेला प्राप्त झाला होता. त्यातून दक्षिण विभागातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांना ५५ इंची १४ स्मार्ट टीव्ही संचाचे वाटप केले.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, प्रा. बी. बी. लगारे यांची रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी तर बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांची रयत शिक्षण संस्थेच्या आजीव सभासदपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. व्ही. एस. राऊत, डॉ. संध्या पोतदार आणि प्रा. एम. आर. रामटेके यांनी केले, तर आभार प्रा. डी. टी. देवकाते यांनी मानले. यावेळी मैनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, मैनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. एम. बी. शेख, दक्षिण विभाग सांगली इन्स्पेक्टर विनयकुमार हनशी, प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, प्रा. शुभांगी भंडारे, प्रा. सी. एन. एस. साळुंखे, सुरेश पाटील, विभागीय सल्लागार सदस्य विलास शिंदे यांच्यासह विद्यार्थी, मुख्याध्यापक, प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

Librarian
Balwant College, Vita

## Tarun Bharat Date- 29-01-2022



सकाळ » TODAY

सांगली परिसर

शनिवार,
२९ जानेवारी २०२२

# बळवंत कॉलेजमध्ये मराठी कथालेखन कार्यशाळा

विटा, ता. २८ : लोककथेतून आजची प्रगल्भ स्वरूपातील कथा घडलेली आहे. कथाप्रियता ही मानवी मनाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. म्हणूनच सर्व वाङ्मय प्रकारात कथा हा वाङ्मय प्रकार मानवी जीवनाशी व मनाशी जवळचा आहे. कथा मानवी मूल्यांची जोपासना करणारा महत्त्वाचा वाङ्मयप्रकार, असे प्रतिपादन डॉ. वामन जाधव यांनी केले.

येथे बळवंत कॉलेज आणि सौ. विजयमाला कदम वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त मराठी कथालेखन कार्यशाळेत ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जाधव म्हणाले, "कथा हा एक समृद्ध असा वाङ्मय प्रकार आहे. मराठी कथेने वेगवेगळ्या कालखंडातून प्रवास करीत विविध रूपे धारण केलेली दिसून येतात.

मानवी मनाचा शोध घेणे हा कथेचा प्रमुख चिंतन विषय राहिला आहे. मानवी मनातील विविध भावभावना कथेतून आविष्कृत होत असतात.

प्रा. मुकुंद वलेकर व डॉ. राजेंद्र मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. रघुराज मेटकरी, डॉ. बालाजी वाघमोडे, ॲड. सतीश लोखंडे, सुनील दबडे, सुधीर इनामदार यांच्यासह नवोदित लेखक उपस्थित होते. डॉ. शिवाजी पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी आभार मानले.

Librarian
Balwant College, Vita

**Sakal Date-30-01-2022**

सकाळ » TODAY

सांगली परिसर

रविवार,
३० जानेवारी २०२२

# परिसरातील सुख-दुःखे कथेत उतरतात

## डॉ. मुकुंद वलेकर यांचे मत; बळवंत महाविद्यालयात कथालेखन कार्यशाळेस प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. २९ : ''कथाकार होण्यासाठी वाचन विपुलता असावी. कथेत प्रवाहही निवेदन असावे ओघवते, धावते, मनाला स्पर्श करणारे निवेदन प्रभावी कथा साकारू शकते. कथा भाषेने सजते, दरवळते भाषाशैली प्रसन्न निर्मिती महत्त्वाची आहे. कथेत संघर्षही उभा करता यायला हवा काही पात्रे एकमेकांना भिडवता आली पाहिजेत. कथेचा शेवट दमदार असावा, असे प्रतिपादन डॉ. मुकुंद वलेकर यांनी व्यक्त केले.

बळवंत कॉलेज सभागृहात बळवंत कॉलेज, आणि विजयमाला कदम वाचनालय यांच्या विद्यमाने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त "मराठी कथालेखन कार्यशाळेत" बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे होते. या कार्यशाळेत दुसरे मार्गदर्शक डॉ.वामन जाधव म्हणाले, "प्राचीन काळापासून माणूस गोष्टीवेल्हाळ आहे. ही परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने संक्रमित होत आली आहे. लोककथेतून आजची प्रगल्भ स्वरूपातील कथा घडलेली आहे.कथाप्रियता ही मानवी मनांची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. कथा हा एक समृद्ध असा वाङ्मय प्रकार आहे.



विटा : बळवंत महाविद्यालयात कथालेखन कार्यशाळेत बोलताना डॉ. मुकुंद वलेकर, डॉ. वामन जाधव, डॉ. राजेंद्र मोरे, रघुराज मेटकरी, प्रा. सुनील दबडे, सुधीर इनामदार आदी.

ज्येष्ठ कवी,लेखक रघुराज मेटकरी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. बालाजी वाघमोडे, ॲड.सतीश लोखंडे, प्रा. सुनील दबडे, गझलकार सुधीर इनामदार, सिराज शिकलगार, मन्सूर जमादार आदी लेखकांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी "बळवंत" या नियतकालिकाचे विमोचन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेसाठी परिसरातील नवोदित लेखक ४८ प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. ऋषिकेश मेटकरी, प्रा. सुनील बुद्धनावर, योगेश्वर मेटकरी, वैशाली कोळेकर यांनी दिले. वनिता होवाळे आणि श्रीमती चंदना तामखडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी आभार मानले.

Librarian
Balwant College, Vita

**Janpravas Date- 10-05-2022**

# बळवंत कॉलेज 'कर्मवीर पारितोषिक' पुरस्काराने सन्मानित

जनप्रवास । प्रतिनिधी

विटा : रयत संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या विट्याच्या भूमीत १९६३ साली बळवंत कॉलेज स्थापन झाले. विटा परिसरातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय करणारे 'बळवंत' हे एक नामांकित महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या 'बळवंत' मध्ये इयत्ता अकरावी पासून ते पदव्युत्तर पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देवून अनेक यशस्वी विद्यार्थी घडविण्यामध्ये 'बळवंत' चा नावलौकिक आहे. अशा नामांकित महाविद्यालयास यावर्षीचा रयत शिक्षण संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या 'कर्मवीर पारितोषिक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



रयत शिक्षण संस्थेमार्फत दिला जाणारा 'कर्मवीर पारितोषिक' पुरस्कार खासदार शरद पवार यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे.

या पुरस्काराचे वितरण पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६३ व्या पुण्यतिथीनिमित्त सातारा येथे आयोजित कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते तसेच संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, उपाध्यक्ष ॲड. भगिरथ शिंदे, सचिव प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार सुप्रिया सुळे, ना.दिलीप वळसे-पाटील, खासदार रामशेठ ठाकूर, ना. डॉ. विश्वजित कदम, आबासाहेब देशमुख, मीनाताई जगधने, माधवराव मोहिते यांच्या उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

Librarian
Balwant College, Vita

**Tarun Bharat Date- 29-03-2022**

दि० २९ मार्च २०२२

तरुण भारत

# साहित्याची समृद्ध परंपरा मराठीने जपली

## डॉ. रवींद्र ठाकूर यांचे प्रतिपादन : बळवंत महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

प्रतिनिधी
विटा

साहित्याची समृद्ध परंपरा मराठी भाषेने जोपासली आहे. बदलत्या काळात साहित्याचे आशय, विषय बदलत गेलेले दिसून येतात. विविध साहित्य प्रकारातून आपले अनुभवविश्व रेखाटताना साहित्यिकांनी सामाजिक अंगाला विशेष महत्त्व दिलेले आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात मराठी पदवी आणि पदव्युत्तर विभाग, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत 'साठोत्तरी मराठी साहित्यातील विविध प्रवाह" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राच्या बीजभाषणात डॉ. ठाकूर बोलत होते. चर्चासत्राचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांचेहस्ते करण्यात आले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाश दुकळे उपस्थित होते. स्वागताध्यक्षपदी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

डॉ. रविंद्र ठाकूर म्हणाले, समाजातील बदलत्या घडामोडींचा आढावा साहित्याने घेणे महत्त्वाचे आहे. साहित्याकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. कालप्रवाहात टिकणारे साहित्यच श्रेष्ठ ठरते. त्यानुषंगाने समाजधर्मी साहित्यलेखन शतकांच्या निकषावर खरे उतरते



**विटा : मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र ठाकूर, यावेळी प्रा. डॉ. शिवलिंग मेदकुदळे, माधवराव मोहिते, प्रा. डॉ. प्रकाश दुकळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे आदी.**

डॉ.शिवलिंग मेनकुदळे यांनी साठोत्तरी कालखंडातील मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचा सखोल आढावा घेतला. त्याचबरोबर साहित्यातील इतिहासाचा नव्याने विचार होण्यासाठी इतिहासाचे पुनर्वाचन आणि पुनर्लेखन होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. प्रकाश दुकळे म्हणाले, मराठी भाषा आणि मराठी साहित्य या विषयांवरील विविधांगी संशोधनाला चालना मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ प्रयत्नशील आहे. भविष्यकाळात मराठी भाषा तसेच साहित्य विषयक विविध चर्चासत्रे आयोजित करण्याचा मानस आहे.

माधवराव मोहिते म्हणाले, रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधून विविध उपक्रम होत असतात. मराठी भाषा आणि मराठी 'साहित्य' या विषयांवर होणाऱ्या उपक्रमांमध्ये प्रत्येकाने आवर्जून सहभाग नोंदविला पाहिजे.

माणसाचे समग्र जगणे साहित्यातून आविष्कृत होत असते. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्रे-आत्मचरित्रे, ललित लेखन अशा विविध साहित्य प्रकारातून मानवी जीवनाचा आलेख अभ्यासता येतो.

प्रा. डॉ. कृष्णा इंगोले यांनी साठोत्तरी साहित्य प्रवाह-प्रेरणा आणि स्वरूप, प्रा. डॉ. चंद्रकांत वाघमारे यांनी दलित साहित्य प्रवाह-मूल्यविचार, प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांनी साठोत्तरी मराठी लघुनियतकालिकांची चळवळ, डॉ. देवानंद सोनटक्के यांनी नव्वदोत्तरी कालखंड आणि साहित्याचे बदलते स्वरूप, प्रा. अविनाश सप्रे यांनी तर मराठी विज्ञान साहित्य या विषयावर, प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर या साधनव्यक्तींची व्याख्याने पार पडली.

चर्चासत्रामध्ये बेळगाव, रत्नागिरी, ठाणे, पालम, नवापूर, सोलापूर, परभणी, कोल्हापूर, सांगली, सातारा येथील जवळपास ७० संशोधक, प्राध्यापक, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तर २५ प्राध्यापकांनी शोधनिबंधांचे वाचन केले.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवाजी पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार यांनी केले, तर आभार डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी मानले. सहसमन्वयक प्रा. सुनील बुद्धनावर, सहसमन्वयक प्रा. वनिता होवाळे, कार्यालयीन अधीक्षक केशव औटी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**Tarun Bharat Date-27-08-2021**

21-22

## तरुण भारत

शुक्रवार, २७ ऑगस्ट २०२१

# बळवंत महाविद्यालयामध्ये ग्रंथालय दिन उत्साहात

**विटा :** येथील बळवंत महाविद्यालयात ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जंयती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा. डी. टी. देवकाते उपस्थित होते.

यावेळी प्रा. डी. टी. देवकाते यांनी ग्रंथालय क्षेत्राला नवीन आयाम देणारे आणि आधुनिक ग्रंथालयाच्या विकासाचा पाया रचण्यात डॉ. रंगनाथन यांचा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत व्यक्त केले. डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर आधारीत भित्तीपत्रकाचे प्रा. देवकाते यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील पन्नासहून अधिक ग्रंथांचे यावेळी प्रदर्शन भरविण्यात आले होते. वाचकांना कमीतकमी वेळेत उपलब्ध होणाऱ्या विविध इ-रिसोर्सेसच्या क्यूआर कोडचे प्रदर्शनही यावेळी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. एस. मोरे, प्रदीप पाटील, भिंगारदेवे, गोरख मोहिते यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

# अत्याधुनिक सुविधा वापरून ग्रंथालयांनी वाचकांपर्यंत पोहोचावे

प्रतिनिधी

विटा

ग्रंथालयाच्या ऑनलाईन सेवा सुविधा उपक्रमातून ग्रंथालय वाचकांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना क्रमिक आणि संदर्भ पुस्तके या माध्यमातून पोहचवण्याचे उत्तरदायित्त्व महाविद्यालयीन ग्रंथालयांचे आहे. विद्यार्थ्यांचे हित पाहता अशा प्रकारच्या सुविधा आणि तंत्रज्ञानाचा वापर होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ग्रंथपाल डॉ. ए. एम. कांबळे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात 'इन्फ्ल्युएन्स ऑफ पेन्डामिक सिच्युऐशन ऑन अकॅडमिक लायब्ररीज् ॲण्ड इटस् सर्व्हिसेस' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालय विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वेबीनार आयोजित करण्यात आली होती. प्रमुख पाहुणे म्हणून वसई येथील अण्णासाहेब वर्तक एएससी कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. ए. एम. कांबळे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

यावेळी डॉ. कांबळे म्हणाले, सध्याच्या कोरानाच्या महामारीमुळे वाचक ग्रंथालयापर्यंत पोहचला नसला, तरी

**विट्यातील बळवंत महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनार**

ग्रंथालयाच्या ऑनलाईन सेवा सुविधा उपक्रमातून ग्रंथालय वाचकांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या दिनचर्येवर वेगवेगळ्या प्रकारचे निर्बंध आल्यामुळे ते वाचनापासून दूर गेले आहेत. यासाठी व्हॉटस्ॲप, ईमेल, क्यूआर कोड अशा विविध स्वरूपांच्या माध्यमातून विद्यार्थी वाचकांना ग्रंथ आणि पुस्तके उपलब्ध करून देण्याचे काम ग्रंथालयाचे आहे, असेही ग्रंथपाल डॉ. कांबळे म्हणाले.

प्राचार्य डॉ. मोरे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना व्हॉटस्ॲप, ईमेल, क्यूआर कोड अशा प्रकारच्या सोयीसुविधांचा वापर करून आपले वाचन अद्ययावत करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी. एम. सनदी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जहांगीर मुलाणी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल प्रा. ए. आर. कांबळे यांनी करून दिला, तर आभार ग्रंथालय समितीचे चेअरमन डॉ. सी. आर. बोबडे यांनी मानले. वेबीनारमध्ये महाविद्यालयासह देशातील विविध महाविद्यालयाचे ग्रंथपाल, विद्यार्थी सहभागी झाले होते.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Librarian
Balwant College, Vita

**Tarun Bharat Date-02-10-2021**

शनिवार, २ ऑक्टोबर २०२१ पान ९ तरुण भारत

# कर्मवीर अण्णांनी शैक्षणिक उद्धारासाठी आयुष्य वेचले

प्रतिनिधी
विटा

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजाच्या शैक्षणिक उद्धारासाठी आयुष्य वेचले. स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा, समता या मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली. रयत शिक्षण संस्थेद्वारे त्यांनी अनेक मौलिक रत्ने घडविली. आज एकूणच रयतचा नावलौकिक आशिया खंडात अग्रस्थानी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४ वी जयंता साजरी करण्यात आली. यावेळी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

प्राचार्य डॉ. मेनकुदळे म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडणघडणीत अनेक महापुरुषांच्या कृतीशील कार्याचा मौलिक वाटा आहे. महात्मा जोतीबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगेबाबा, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार कार्यामुळे आजचा महाराष्ट्र शैक्षणिक पातळीवर अग्रस्थानी आहे. संकुचितवाद, जातिभेदाच्या भिंती शिक्षणामुळे नष्ट होतील. शिक्षणाची संजीवनीच बहुजन समाजाला तारू शकेल, असे कर्मवीरांचे मत होते. त्यासाठीच त्यांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन केली.

**बळवंत महाविद्यालयात कर्मवीर जयंती उत्साहात**

कर्मवीरांनी सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतिगृहाची निर्मिती करून समताधिष्ठित समाज निर्माण केला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये, गावकुसाबाहेर, डोंगर-दऱ्यामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असणारी गुणवत्ता त्यांनी ओळखली होती. आर्थिक, सामाजिक कारणास्तव त्यांची शैक्षणिक प्रगती थांबू नये, म्हणून अण्णांनी बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची कवाडे मुक्तहस्ताने खुली केली. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे एकूणच जीवनकार्य शब्दात न सामावणारे आहे. आजच्या पिढीसाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य दीपस्तंभासम आहे, असेही प्राचार्य डॉ. मेनकुदळे म्हणाले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. आज आधुनिक काळात रयत शिक्षण संस्थेतून विविध नवनवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना दिले जात आहेत. विविध देशी-विदेशी शिक्षण संस्थांशी सामंजस्य करार करून विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे, असेही प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले.

प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्या डॉ. श्रेया पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. आर. एच. चव्हाण यांनी केले, तर आभार प्रा. के. एम. धुमाळ यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Librarian
Balwant College, Vita

**Tarun Bharat Date-21-12-2021**

दैनिक तरुण भारत दि. २१/१२/२०२१

# सामाजिक जाणीव म्हणून रक्तदान करा : प्रा. डॉ. मोरे

विटा : रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. अनेक रूग्णांना वेळेत रक्त न मिळाल्याने त्यांचा मृत्यू होतो. एक सामाजिक जाणीव म्हणून समाजातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे, असे प्रतिपादन बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बळवंत महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना, एनएनसी, हेल्थ आणि योगा सेंटर, एचडीएफसी बँक शाखा विटा यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी एचडीएफसी विटा शाखेचे प्रबंधक मंदार देशमुख, उप-प्रबंधक गिरीश भोसले, गोपालकुमार राम, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले, रक्तदानाचे महत्त्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत पोहचविले पाहिजे. रयत शिक्षण संस्था, बळवंत महाविद्यालय रक्तदान शिबिरासारखे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते. शिबिरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक अशा एकूण ९० जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरासाठी श्री. वसंतदादा पाटील ब्लड बँक, सांगली यांचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी होण्यासाठी डॉ. मल्लिकार्जुन बंदारे, डॉ. प्रितेश गुगळे यांनी परिश्रम घेतले.

Librarian
Balwant College, Vita

**Lokmat Date-20-12-2021**

दैनिक लोकमत. दि. २०/१२/२०२१.

## सांगलीत डम्परच्या धडकेत वृद्ध ठार

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : शहरातील कुपवाड रस्त्यावर असलेल्या लक्ष्मी मंदिरजवळ डम्परने दिलेल्या धडकेत वृद्ध ठार झाला. अशोक नामदेव जगधने (वय ६५, रा. रेल्वेस्टेशन समोर, सांगली) असे मृताचे नाव आहे. अपघातप्रकरणी डम्पर चालक मल्लाप्पा भरमाप्पा काळे (रा. विजयनगर, सांगली) याच्यावर संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास हा अपघात घडला.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, मृत जगधने हे शुक्रवारी सकाळी सायकलने कुपवाडकडून सांगलीकडे येत होते. लक्ष्मीमंदिरपासून काही अंतरावर ते आल्यानंतर भरधाव वेगात आलेल्या डंपरने त्यांना धडक दिली. धडकेत ते खाली पडल्याने बेशुद्ध पडले. अपघातानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र ते मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघात झाल्यानंतर डंपरचालक मल्लाप्पा काळे हा घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी पंचनामा करून डंपर ताब्यात घेत मल्लाप्पा काळे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.



विटा येथील बळवंत महाविद्यालयातील कार्यक्रमावेळी प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे उपस्थित होते.

# समृद्ध साहित्य जगण्यास सकारात्मक दिशा देते

## आबासाहेब शिंदे : विट्यामध्ये कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

विटा : वाचन संस्कृती जितक्या प्रभावीपणे रुजेल तितक्याच प्रभावीपणे सकस साहित्यनिर्मितीही होईल. समृद्ध साहित्य जगण्याला सकारात्मक दिशा देते, असे प्रतिपादन कवठेमहांकाळ येथील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे यांनी केले.

विटा येथील बळवंत महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा.डॉ. शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

डॉ. शिंदे म्हणाले, मराठी साहित्याला प्राचीन आणि समृद्ध अशी परंपरा आहे. मोबाइल, इंटरनेटच्या आजच्या काळात वाचन संस्कृती लोप होते की काय, अशी भीती व्यक्त होत आहे.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी समृद्ध मूल्यांनी परिपूर्ण असणाऱ्या मराठी साहित्यिकांचा वारसा अविरत पुढे चालविण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी समृद्ध वाचन संस्कृती जोपासावी, असे आवाहन केले.

प्रा. डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. वनिता होवाळे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. सुनील बुद्धिनावर यांनी आभार मानले.

Librarian
Balwant College, Vita

**Tarun Bharat Date- 20-12-2021**

तरुण भारत
सांगली
www.tarunbharat.com

# ‘पदवीधर विद्यार्थी ही देशाची संपत्ती’

## तरुण पिढीला पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित शिक्षक महत्वाचे

प्रतिनिधी
विटा

पदवीधर विद्यार्थी ही देशाची संपत्ती आहे. त्यांनी कर्तृत्ववान पुरूषांच्या विचारांचा, कार्याचा आदर्श घेणे गरजेचे आहे. प्रत्येक देशाच्या विकासात तरूण पिढीचे योगदान महत्त्वाचे असते. भारत हा तरूणांचा देश म्हणून ओळखला जातो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालय आणि बुर्ली, रामानंदनगर येथील एएससी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने पदवीप्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. सावंत बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे विद्यापरिषद सदस्य डॉ. एस. एस. भोला, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



विटा : पदवीप्रमाणपत्र प्रदान समारंभात बोलताना प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, यावेळी एस. एस. भोला, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांच्यासह मान्यवर.

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत म्हणाले, भारतीय शिक्षण व्यवस्थेनुसार पंधरा ते सतरा वर्षाच्या कठोर परिश्रमानंतर विद्यार्थी पदवीधर होतो. पदवीधर होणे म्हण्जे जीवनातील एक मोठे स्वप्न पूर्ण होणे. आजच्या तरूण पिढीला पारंपरिका शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित शिक्षण महत्त्वाचे आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, अब्राहम लिंकन, एपीजे अब्दुल कलाम, लता मंगेशकर, शेक्सपिअर अशा महान लोकांनी शून्यातून आपले विश्व निर्माण केले, त्यांच्याकडून प्रेरणा घेणे, ही काळाची गरज आहे, असेही प्राचार्य डॉ. सावंत म्हणाले.

डॉ. एस. एस. भोला यांनी इतर विद्यापीठाच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठात शिकलेला विद्यार्थी हा अधिक सक्षम असतो, असे सांगत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा, असे आवाहन केले. दोन्ही महाविद्यालयाचे वार्षिक अहवाल वाचन एएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले. यावेळी बळवंत महाविद्यालयाचे २११ आणि एएससी कॉलेजचे ४९ पदवी प्राप्त स्नातकांना मान्यवरांच्याहस्ते पदवीप्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी दोन्ही महाविद्यालयाचे पदवीप्राप्त स्नातक, आजी-माजी विद्यार्थी, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, प्राध्यापक, एनसीसी छात्र, पालक उपस्थित होते.

Balwant College, Vita Library

LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Tarun Bharat Date- 20-12-2021**


# तरुण भारत

सांगली

www.tarunbharat.com


## मराठी भाषा संवर्धनासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्त्वाचे

प्रतिनिधी

विटा

मराठी भाषेला प्राचीन असा समृद्ध वारसा आहे. कोणतीही भाषा तिच्या जन्मापासून प्रौढावस्थेकडे प्रवास करीत असते. परंतु मराठी भाषेत जन्मताच प्रौढपणाची लक्षणे दिसून येतात. संत ज्ञानेश्वर लिखित 'ज्ञानेश्वरी' हे याचे उत्तम उदाहरण आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. वाघुंबरे बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजी पाटील होते.

डॉ. वाघुंबरे म्हणाले, कालौघात भाषेत नित्यनवे परिवर्तन घडत असतात. परकीय भाषांच्या संपर्कामुळे मराठी भाष प्रभावीत झाली आहे. आपल्या मायमराठी मातृभाषेचे संवर्धन करणे, प्रत्येक मराठी व्यक्तींचे आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत. प्राचीन वारसा असणाऱ्या मराठी भाषेतील साहित्य समृद्ध आहे कविता, कथा, कादंबरी, नाटक अशा अनेक वाङमय प्रकारातून मानवी जीवनातील अनमोल रत्ने साहित्यिकांनी मराठी भाषेतून उधळली आहेत. मराठी भाषिक संस्कृती संपूर्ण जगात आदर्शवत आहे, असेही डॉ. वाघुंबरे म्हणाले.

डॉ. शिवाजी पाटील यांनी कविवर्य कुसुमाग्रज. यांच्या साहित्याची ओळख करून दिली. महाराष्ट्र शासनाने पहिली ते दहावीच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य केल्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कविता वाचन केले.


LIBRARIAN
Balwant College
VITA.